महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर यांचे कार्यालय

## (आस्थापना शाखा)

पार्श्वनाथ ९, बिडको नाका, चिंतुपाडा, माहिम
पालघर, ता.जि. - पालघर

दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११
Email ID : estcollectorpalghar@gmail.com

---

**वाचले :-** १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः अकंपा/१००/प्र.क्र.५१/२००४/आठ, दि.२२/०८/२००५.

२. शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक प्राफेब.११०८/प्र.क्र.१६७/ठाणे/म-१०, दि.३१/०७/२०१४.

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः अकंपा/१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि.२१/०९/२०१७.

४. मा.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ यांचेकडील पत्र क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.१८२/का.८, दि. २३/०१/२०१८.

५. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील ज्ञापन क्रमांक/सामान्य/का-१/टे-३/आस्था/अनुकंपा/प्रतिक्षासूची/२०१९, दि.११/०२/२०१९

६. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील ज्ञापन सुधारीत अंतिम यादी क्रमांक/सामान्य/का-१/टे- ३/आस्था/ अनुकंपा/वर्ग-ड/ प्रतिक्षासूची/२०१९, दि.०३/०८/२०१९

७. या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक २७/०८/२०१९

---

क्र.महसूल/आस्था/क-१/टे-२/अनुकंपा/प्रा.म.प्र.सूची/एसआर-८३/२०१९ दिनांक २७/०८/२०१९

---

**ज्ञापन :-**

१. ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.१ शासन निर्णय दिनांक २२/०५/२००८ मधील तरतुदींनुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडील सामायिक प्रतिक्षासूची बरोबरच संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील गट - क व गट - ड करीता प्रतिक्षासूची ठेवणेची दुहेरी प्रतिक्षासूची ची कार्यपध्दती आहे. सदर शासन निर्णयानुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांचे कार्यालयातील अनुकंपा प्रकरणांची छाननी करुन अनुकंपा उमेदवारांची नावे गट - क व गट - ड प्रतिक्षासूचीत समाविष्ट करुन, त्यांची नांवे संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सामायिक प्रतिक्षासूचीत समाविष्ट करण्यासाठी पाठवावी, अशी तरतूद आहे.

२. ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.२ शासन अधिसूचना, महसूल व वनविभागाकडील दिनांक ३१/०७/२०१४ अन्वये ठाणे जिल्हयाचे विभाजन हाऊन दिनांक ०१/०८/२०१४ रोजी पूर्वाश्रमीच्या ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन दिनांक ०१/०८/२०१४ पासून नवनिर्मित पालघर जिल्हा निर्माण झालेला आहे. शासन निर्णय, महसूल व वनविभागाकडील दिनांक १९/०८/२०१६ अन्वये ठाणे जिल्हयाचे विभाजनानंतर नवनिर्मित पालघर व ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे त्यांच्या विकल्पानुसार समायोजन करण्याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या, त्यानुसार जिल्हा कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे विकल्प घेऊन त्यांच्या विकल्पानुसार समायोजनाची कार्यवाही करणेंत आलेली आहे.

३. त्याचप्रमाणे मुळ ठाणे जिल्हयातील दिनांक ३१/०७/२०१४ पूर्वीची अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीच्या सामायिक प्रतिक्षासूचीबाबत शासन स्तरावरुन मार्गदर्शक सूचना नसल्यामुळे ठाणे व पालघर जिल्हयाची प्रतिक्षासूची स्वतंत्र करणेबाबत कार्यवाही बाबत या कार्यालयाचे स्तरावरुन मा.विभागीय आयुक्त, कार्यालय कोंकण विभाग, कोंकण भवन व शासन यांना मार्गदर्शन मिळणेकामी विनंती करणेंत आली होती.

४. ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.४ सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २३/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील सामायिक प्रतीक्षासूचीतील जी प्रकरणे, (दि.३१/०७/२०१४ पूर्वीची) पूर्वाश्रमीच्या ठाणे जिल्हयातील पालघर, वसई, डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा व विक्रमगड या क्षेत्रातील कार्यालय/विभागाकडून आली आहेत ती प्रकरणे ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने नवनिर्मित पालघर जिल्हयातील

सामायिक प्रतीक्षासूचीमध्ये समाविष्ट करण्यासाठी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वर्ग करावीत. तद्नंतर पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाकडील दिनांक ०१/०८/२०१४ नंतरचे प्राप्त अनुकंपा प्रस्तावांच्या अनुषंगाने उमेदवारांची नावे त्यांच्या अर्जाच्या दिनांकानुसार प्रतीक्षासूचीत समाविष्ट करावीत, असे निर्देशित करणेंत आलेले होते.

५. ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.५ व ६ नुसार जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांनी दिनांक ११/०२/२०१९ अन्वये पूर्वश्रमीच्या ठाणे जिल्हयाचे विभाजनानंतर ठाणे जिल्हा व नवनिर्मित पालघर जिल्हयाची दिनांक २२/०८/२००५ नंतरची अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसाठी उमेदवारांची गट - क व गट - ड तसेच दिनांक २२/०८/२००५ पूर्वीची गट - ड संवर्गाची प्रारुप सामायिक प्रतिक्षायादी तसेच गट - क व गट - ड संवर्गाची अंतिम महसूल प्रतिक्षायादी प्रसिध्द करणेंत आलेली आहे. तसेच दिनांक ०३/०८/२०१९ अन्वये दिनांक २२/०८/२००५ नंतरची गट - ड सवंर्गातील अनुकंपा उमेदवारांची सुधारीत अंतिम सामाईक प्रतिक्षासूची प्रसिध्द करणेंत आलेली आहे.

६. ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र.५ व ६ नुसार जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांनी दिनांक ३१/०७/२०१४ पर्यंत गट - क व गट - ड संवर्गाची उमेदवारांची अंतिम महसूल प्रतिक्षायादी प्रसिध्द केलेली आहे. तद्नंतर दिनांक ०१/०८/२०१४ पासून पालघर जिल्हयातील कार्यक्षेत्रातील महसूल विभागातील उपोद्घातातील शासन निर्णयांमधील तरतुदींनुसार अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसाठी उमेदवारांची गट - क व गट - ड संवर्गातील उमेदवारांची यादी तयार करणेंत आलेली आहे.

७. त्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र. ५ दिनांक २३/०१/२०१८ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार पालघर जिल्हयातील कार्यक्षेत्रातील महसूल विभागातील अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसाठी उमेदवारांची गट - क व गट - ड संवर्गाची प्रारुप महसूल प्रतिक्षायादी प्रसिध्द करणेंत येत आहे.

सर्व कार्यालय / शाखा प्रमूख यांनी अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसाठी उमेदवारांची गट - क व गट - ड संवर्गाची प्रारुप महसूल प्रतिक्षा यादया त्यांच्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन, सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. सदरच्या प्रतिक्षायादया प्रसिध्द केलेबाबतचा अहवाल या कार्यालयास आठ रोजात सादर करावा. त्याचप्रमाणे सदर याद्यांवर काही हरकती/सूचना असल्यास १५ दिवसांच्या आत संबंधित कागदपत्रांसह व स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करावा, मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती/सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी/-)
(डॉ.कैलास शिंदे)
जिल्हाधिकारी पालघर

प्रत :- माहितीसाठी सविनय सादर

१. मा.अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, (का-८) मंत्रालय, मुंबई.
३. मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई.

प्रत :- माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

१. अपर जिल्हाधिकारी पालघर मुख्यालय, जव्हार
२. सहाय्यक जिल्हाधिकारी डहाणू/जव्हार
३. जिल्हा पुरवठा अधिकारी पालघर
४. उपजिल्हाधिकारी सामान्य/निवडणूक/भूसंपादन (सूर्या प्रकल्प डहाणू)/पुनर्वसन/रोहयो,
५. उपविभागीय अधिकारी पालघर/वसई/वाडा
६. तहसिलदार पालघर/वसई/डहाणू/तलासरी/जव्हार/मोखाडा/वाडा/विक्रमगड
७. जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी, पालघर

२/- सदर अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसाठी उमेदवारांची गट - क व गट - ड संवर्गाची प्रारुप महसूल प्रतिक्षायादी या कार्यालयाचे (www.collectorpalghar.nic.in) या संकेत स्थळावर प्रसिध्द करावी. सदर यादी संकेत स्थळावर १५ दिवस ठेवण्यांत यावी.

(स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी
यांची स्वाक्षरी असे.)

(उज्वला भगत)
तहसिलदार (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय पालघर